# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

3357 ते 3356 जा.क्र/वि-५/कॉलेजविस्तार/पापु/क ८८आदेश/२०१७
उपनिबंधक, सहकारी संस्था,संगमनेर यांचे
कार्यालय, ता.संगमनेर, जिल्हा अहमदनगर.
दिनांक -: १४/०९/२०१७

<u>वाचावे</u> -: १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८
२) कु.पी.एन.सुर्वे,सह.अधि.श्रेणी-१ तथा चौकशी अधिकारी यांचेकडील
कलम ८३ अन्वयेचा दिनांक ०७/०९/२०१७ रोजीचा चौकशी अहवाल

ज्याअर्थी कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.गुंजाळवाडी, ता.संगमनेर जि. अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोंदणी झालेली सहकारी संस्था असुन तिचा नोंदणी क्रमांक एएनआर/एसएमआर/एलएफटी/१२३५/१९८३ दिनांक २९ ऑक्टोबर १९८३ असा आहे.

ज्याअर्थी, कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.गुंजाळवाडी, ता.संगमनेर जि. अहमदनगर या संस्थेचे कामकाजाबाबत व ठेवीबाबत या कार्यालयाकडे तक्रार अर्ज प्राप्त झाला होता. सदर अर्जाच्या चौकशी दरम्यान संस्थेच्या कामकाज, आर्थिक स्थितीबाबत आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेने या कार्यालयाकडील दिनांक २४/०३/२०१७ रोजीच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयेचे आदेशान्वये चौकशी करणेसाठी कु.पी.एन.सुर्वे यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती केलेनुसार त्यांनी संदर्भिय क्रमांक २ चे पत्रान्वये कलम ८३ अन्वये अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

ज्याअर्थी, सदर अहवालात संस्थेचे आर्थिक नुकसान झालेबाबत कळविले आहे. सदर अहवालामध्ये असे नमुद केले आहे की, संस्थेने रक्कम रु.७,६४,५८१/- या रक्कमेची गुंतवणुक ही सरदार त्रिंबकजी डेंगळे नागरी सहकारी पतसंस्था मर्या.संगमनेर या पतसंस्थेत नियमबाहय गुंतवणुक केलेली आहे. संस्थेच्या संचालक मंडळाने संस्थेच्या उपविधीप्रमाणे व सहकारी कायद्यानुसार गुंतवणुक न करता बेकायदेशीर रित्या पतसंस्थेत गुंतवणुक केलेली आहे. संस्थेच्या मुदतठेव पावतीची मुदत संपुष्टात आलेली असुन सदर रक्कमेपैकी केवळ रु.२,१५,०००/- ऐवढी रक्कम वसुल झालेली आहे. उर्वरीत रक्कम व त्यावर होणारे व्याज मुदत संपुनही मिळाली नसल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

ज्याअर्थी, संस्थेचे संचालक मंडळ, व्यवस्थापक,चेअरमन, व व्हाईस चेअरमन अशा संबंधीतांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार जबाबदारी पार न पडल्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसुन येते.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे कलम ८८(१) ची तरतुद पुढीलप्रमाणे आहे-

**एखाद्या संस्थेची कलम ८१ अन्वये लेखापरिक्षण किंवा कलम ८३ अन्वये चौकशी किंवा कलम ८४ अन्वये निरिक्षण चालु असताना किंवा त्या संस्थेचे समापन होत असताना किंवा अशा लेखापरिक्षेच्या, चौकशीच्या, निरिक्षणाच्या, किंवा समापनाच्या परिणामी लेखापरिक्षकाने किंवा**

कलम ८३ अन्वये चौकशी करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम ८४ अन्वये पुस्तकांचे निरिक्षण करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने किंवा कलम १०५ अन्वये परिसमापकाने दिलेल्या अहवालाच्या आधारे किंवा अन्यथा, संस्थेच्या रचनेत किंवा व्यवस्थापनात जिने कोणताही भाग घेतला होता, अशा कोणत्याही व्यक्तीने किंवा संस्थेच्या कोणत्याही, मृत किंवा माजी किंवा विदयमान अधिका-याने अशा लेखापरीक्षेच्या किंवा चौकशीच्या, निरीक्षणाच्या किंवा समापनाच्या प्रारंभाच्या तारखेपुर्वी पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेच्या कोणत्याही पैशांचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले किंवा त्याने असा पैसा किंवा मालमत्ता ठेवुन घेतली आहे किंवा त्याच्या संबधात, तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे, किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्याबद्दल तो दोषी झाला आहे, याबद्दल निबंधकाची खात्री होईल तर, निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्तीविरुध्द किंवा व्यक्तींविरुध्द आरोप ठेवता येईल आणि संबंधीत व्यक्तीस आणि मृत व्यक्तिच्या बाबतीत तिची मालमत्ता ज्याला वारसाने मिळाली असेल, अशा तिच्या प्रतिनिधीस आरोपाबाबत उत्तर देण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, निबंधक किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती या कलमानुसार ठरवील त्या दराने जे व्याज होईल त्या व्याजासह, तो पैसा किंवा ती मालमत्ता किंवा त्या पैशाचा किंवा मालमत्तेचा कोणताही भाग, याची परतफेड करण्यास किंवा तो परत करण्यास किंवा असे अपयोजन केल्याबददल, ठेवुन घेतल्या बद्दल, अपकार्याबदल किंवा विश्वासघात केल्याबदल भरपाई म्हणुन निंबधक किंवा अशी व्यक्ती ठरवील, ती रक्कम संस्थेच्या मत्तेत भरण्याविषयी आदेश देता येईल.

ज्याअर्थी, वाचावे क्र.२ अन्वये संस्थेच्या ठेवींचे म्हणजेच पैशांचे अपयोजन झाले असल्याचे दिसुन येते. तसेच ,संस्थेच्या बाबतीत अधिकाराचा गैरवापर केले असल्याचे निदर्शनास येते.

त्याअर्थी, संस्थेतील आर्थिक रक्कमेच्या नुकसानीची संपुर्ण चौकशी होवुन संबधीतांविरुध्द आर्थिक जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## - आदेश -

मी जयेश एस.आहेर, उपनिबंधक,सहकारी संस्था, संगमनेर,ता.संगमनेर जि. अहमदनगर, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ चे नियम ७२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.गुंजाळवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर या संस्थेची सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केलेल्या मुदयांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ चे नियम ७२ नुसार चौकशी करण्यासाठी श्री.जे.बी.शेळके, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,राहाता,जि.अहमदनगर यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. त्यानुसार त्यांनी संबंधितांविरुध्द आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करावी.चौकशी खर्च कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्यादीत,गुंजाळवाडी,

ता.संगमनेर या संस्थेने करावयाचा असुन सदर चौकशी खर्चाची जबाबदारी चौकशी अधिका-याने त्यांचे चौकशी अहवालात निश्चित करावी.

सदरचा आदेश आज दिनांक १४/९/२०१७ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी जारी केला आहे.

(जयेश एस.आहेर )
उपनिबंधक
सहकारी संस्था,संगमनेर.

प्रत :-

१) श्री.जे.बी.शेळके, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, राहाता जि.अहमदनगर तथा प्राधिकृत अधिकारी, कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या. गुंजाळवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर

२/- त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशानुसार आपण चौकशीचे कामकाज तात्काळ सुरु करुन विहीत मुदतीत अहवाल सादर करावा.

२) चेअरमन/मॅनेजर कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.गुंजाळवाडी, ता.संगमनेर जि.अहमदनगर

२/- त्यानां सुचना देण्यात येते की, चौकशीकामी प्राधिकृत आधिका-यास वेळोवळी सर्व आवश्यक ती काग्रदपत्रे व दप्तर उपलब्ध करुन माहिती पुरवावी.

३) चेअरमन/मॅनेजर, हरीश्चंद्र सहकारी पाणीपुरवठा संस्थांचे फेडरेशन लि. अमृतनगर, ता.संगमनेर, जि.अ.नगर

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. विभागीय सहनिबंधक ,सहकारी संस्था नाशिक, विभाग नाशिक.
२) मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर.
३) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक ,सहकारी संस्था,अहमदनगर

उपनिबंधक
सहकारी संस्था,संगमनेर.

# परिशिष्ट- अ -

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये दि.१४/०९/२०१७ चे जोडपत्र.**

कॉलेज विस्तार सहकारी पाणी पुरवठा सेवा संस्था मर्या.गुंजाळवाडी,ता.संगमनेर ,जि. अहमदनगर या संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ नुसार केलेल्या चौकशीनुसार संस्थेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. सबब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ नुसार आर्थिक नुकसानीची संबधितावर जबाबदारी निश्चितीबाबतचे मुदयांचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | संस्थेचा ठराव दिनांक व क्रमांक | मुदतठेव पावती क्र व दिनांक | मुदत ठेव रक्कम | मुदतीनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | दि.३१/५/२०१२ ठराव क्र.३ व ४ | दि.१४/६/१२ मुदत ठेव पावती क्र.३०६ | रु.१,९७,६५६ | रु.२,१७,४२१ |
| २ | | दि.१४/६/१२ मुदत ठेव पावती क्र.३०७ | रु.१,८१,३४५ | रु.१,९६,७५९ |
| ३ | | दि.१४/६/१२ मुदत ठेव पावती क्र.३०८ | रु.३,८५,५८० | ४,२४,१३८ |
| | | एकुण | रु.७,६४,५८१ | |

तसेच, संस्थेचे कलम ८३ चे चौकशी अहवालानुसार निदर्शनास येणा-या बाबी.

उपनिबंधक
सहकारी संस्था संगमनेर